पुढारी

# पालघर जिल्ह्यातील पाच गावे होणार स्वच्छतायुक्त

## कुरगाव, हमरापूर, करंजगाव, शिरोशी आणि वेवजीचा समावेश : मुख्य कार्यकारी अधिकारी सालीमठ यांची माहिती

**पालघर : पुढारी वृत्तसेवा**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यातील हागणदारी मुक्ततेचे मानांकन प्राप्त गावांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पाच गावांची नावे जाहीर करण्यात आली असून यामध्ये पालघर तालुक्यातील कुरगाव, वाडा तालुक्यातील हमरापूर आणि करंजगाव, जव्हार तालुक्यातील शिरोशी, तर तलासरी तालुक्यातील वेवजी या गावांचा समावेश आहे. अशी पाच गावे हागणदारी मुक्त जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिली.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा २ मध्ये शौचालयांचे बांधकाम / पुर्नप्रस्थापिकरण, सामुदायिक शौचालय संकुल, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करून स्वच्छता शाश्वतरीत्या कायम राखण्यासाठी वरील गावे हागणदारी मुक्त अधिक घोषित करण्याचे निकषानुसार हा निर्णय घेण्यात आला असल्याचेही सालीमठ यांनी सांगितले. या गावांतील प्रत्येक कुटुंबाला कार्यरत शौचालयाची सुविधा उपलब्ध असून, त्याचा वापर करतात ज्या व्यक्तीकडे शौचालय नाहीत ती कुटुंबे सामुदायिक किंवा सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. शाळा व अंगणवाडीमध्ये शौचालय सुविधा आहे. गावातील सार्वजनिक ठिकाणी कमीत कमी कचरा निर्मिती, कमीत कमी सांडपाणी, गावात प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केले आहे.

गावात शाश्वत स्वच्छता राखून गावातील लोकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी ग्रामपंचायती विविध उपक्रम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेची जाणीव जागृती करण्यात आली, अशी गावे हागणदारी मुक्त अधिक जाहीर करण्यात येणार असल्याचे पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक तुषार माळी यांनी सांगितले.

### घनकचरा व्यवस्थापनाकरिता गोबरधन प्रकल्प उभारणार

**स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत पायाभूत सर्वेक्षणानुसार वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण करून गाव हागणदारी मुक्त जाहीर करण्यात आली आहेत. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे राज्यात सहकार तत्त्वावर आधारित घनकचरा व्यवस्थापनाकरिता गोबरधन प्रकल्प उभारणी करण्यात येणार आहे.**

**२०२१-२२ ते २०२४-२०२५ या कालावधीत राज्यात सहकार तत्त्वावर आधारित पथदर्शी जिल्हास्तरीय गोबरधन प्रकल्प, तालुकास्तरीय, ग्रामीण भागात क्लस्टर स्वरुपात व गावस्तरावर वैयक्तिक स्तरीय गोबरधन प्रकल्प राबण्यात योणार आहेत. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व अनुषंगिक अंदाजपत्रकीय प्रस्तावाच्या मान्यतेसाठी जिल्हास्तरीय तांत्रिक यंत्रणांना निवड करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.**

**पालघर जिल्ह्यातील २०२१-२२ करिता पशुधन असलेल्या गावांची निवड येणार आहे. या प्रकल्पामध्ये जनावरांचे शेण, स्वयंपाकघरातील उरलेला भाग, पिकांचे अवशेष, बाजारातील कचरा आणि मैलागाळ यासह मोठ्या प्रमाणात जैव-कचर्याचा उपयोग करून गावात स्वच्छता सुनिश्चित करणे, बायोगॅसमध्ये टाकून ऊर्जा निर्माण करणे आणि ग्रामस्थांचे जीवन सुधारणे, गोबरधन योजनेमुळे घनकचरा, विशेषत: गावांमधील जैव-कृषी कचरा सुरक्षित आणि प्रभावी व्यवस्थापनामध्ये लोकांशी संलग्न होणे अपेक्षित आहे. जेणेकरून गावे स्वच्छ राहतील.**

My Palghar Edition
Aug 14, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in